# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-३१/२०२५ दिनांक- २३/०१/२०२५

## प्रेस नोट

**नयानगर पोलीस ठाणे गुरनं I २६०/२०२१, भा.दं.वि.सं कलम कलम ३७६ (१)(२) सह पोक्सो कायदा कलम-४,८ प्रमाणे दाखल गुन्हयातील आरोपीस मा.न्यायालयाने सुनावली २० वर्ष सश्रम कारावास व १०००/रु दंडाची शिक्षा**

यातील आरोपीत वकील अहमद सगीर हसन शेख, वय-५६ वर्षे हा फिर्यादीच्या नणंदचा पती असुन त्याने फिर्यादीची अल्पवयीन पीडीत मुलगी वय - ८ वर्षे हीचेवर घरात कोणीही नसल्याचा फायदा घेवुन पिडीतेस मारण्याची धमकी देवुन वेळोवेळी तीचे ईच्छेविरुध्द, जबरदस्तीने शारीरीक संभोग केला म्हणून नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि नं. I २६०/२०२१, भा.दं.वि.सं कलम कलम ३७६ (१)(२) सह पोक्सो कायदा कलम ४, ८ प्रमाणे गुन्हा दिनांक १०/०४/२०२१ रोजी १६.५७ वा दाखल आहे.

सदर गुन्हयातील आरोपीत वकील अहमद सगीर हसन शेख, वय-५६ वर्षे यास दिनांक १०/४/२०२१ रोजी २०.४३ वा. अटक करुन त्याचे विरुध्द मा न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आले आहे.

सदर गुन्हयाची मा.अति. जिल्हा व सत्र न्यायालय ठाणे यांचे न्यायालयात सुनावणी सुरु होती. दिनांक ०६.०१.२०२५ रोजी केसची अंतिम सुनावणी होवुन मा.न्यायालयाने आरोपीत यास सीआरपीसी २३५ (२) अन्वये २० वर्ष सश्रम कारावास व १०००/रु दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर गुन्हयाचा तपास तत्कालिन पोउनि सुनिल साळुंखे (सध्या नेमणुक मिरारोड पोस्टे) यांनी केला असुन त्यांना सदर गुन्हयात पोहवा/०६०३५ निशांत दरेकर, सध्या नेमणुक काशिमीरा वाहतुक शाखा, युनिट - ०१, यांनी पुरावे गोळा करणे व कागदपत्र बनविण्यात मदत केली आहे.

मा.न्यायाधीश श्रीमती व्हि एल भोसले मॅडम, मा.अति. जिल्हा व सत्र न्यायालय ठाणे यांनी आरोपीस सदरची शिक्षा पारित केली असुन सदर केसमध्ये सरकारतर्फे मा.सरकारी अभियोक्ता श्रीमती चंदणे मॅडम यांनी कामकाज पाहीले. सदर केसमध्ये मा.श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परि.०१,मिरारोड, मा.श्री.विवेक मुगळीकर, सहा.पोलीस आयुक्त,नवघर विभाग तसेच तत्कालिन वपोनिरी श्री.कैलास बर्वे (सध्या मा.सहा.पो.आयुक्त, बृहन्मुबई ), तत्कालिन वपोनिरी श्री. जितेंद्र वनकोटी (सध्या नेमणुक पेल्हार पोलीस ठाणे), तत्कालिन वपोनिरी श्री विलास सुपे (आर्थिक गुनहे शाखा), वपोनिरी श्री अमर जगदाळे सध्या नेमणुक नयानगर पो.स्टे यांचे मार्गदर्शनाखाली पैरवी अधिकारी म्हणुन श्रे.पोउनि महादेव इंगवले यांनी न्यायालयीन कामकाजात योग्य ती मदत केली असुन वॉरंट/ समन्स अंमलदार सहा फौ सुपडु तडवी (सध्या संलग्न - मुख्यालय), पोअं/२२०४२ शैलेश साबळे, पोअं/२३१०८ निरज घोडेकर यांनी वेळोवेळी मा.न्यायालयाकडुन प्राप्त समन्सची बजावणी करुन व साक्षीदार यांना वेळोवेळी साक्षकामी मा.न्यायालयात हजर ठेवुन महत्वाची भुमिका बजावली आहे.